# मेट्रो-३ची आज चाचणी

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

मुंबई । कारशेडच्या मुद्यावरून भाजप आणि शिवसेना यांच्यात वाद रंगलेला असतानाच कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरच्या मेट्रो-३ ची मंगळवार ३० ऑगस्ट रोजी चाचणी होणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेट्रो-३ ची चाचणी होणार आहे. आरेच्या सारीपुत नगर येथील ट्रॅकवरती सकाळी ११ वाजता ही चाचणी होणार आहे.

या मेट्रोसाठी दोन रॅक मुंबईत दाखल झाले आहेत. मेट्रो-३ चे भुयारीकरणाचे काम ९६ टक्के पूर्ण झाले आहे. तर एकूण प्रकल्पाचे काम ६७ टक्के झाले आहे. मात्र, कारशेडबाबत निर्णय झालेला नसल्याने मेट्रो-३ चे भवितव्य अंधारातच आहे. कारशेड निर्णयाच्या विलंबामुळे मेट्रो - ३ ची मुदत साधारण दोन-तीन वर्षे पुढे जाण्याची भीती आहे.